# निवडणूक कार्यालय
# पुणे महानगरपालिका

दिनांक :- 09/11/2021

## प्रेस नोट

आगामी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचेतर्फे दि. १ ते ३० नोव्हेंबर २०२१ या कालावधीमध्ये मतदार यादी अद्यावत करणेच्या अनुषंगाने विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम राबवण्यात येत आहे.याबाबत जनजागृती करणेची कार्यवाही संयुक्तरित्या जिल्हाधिकारी, पुणे व महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेतर्फे करण्यात येत आहे.

मतदार यादी अद्यावत करणेच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाबाबतची माहिती पुणे शहरातील नागरिकांना करून देण्यासाठी विविध माध्यमाद्वारे प्रसिद्धी व प्रचार करण्यात येत आहे. यामध्ये गर्दीच्या ठिकाणी पोस्टर्स लावणे, घंटगाड्यांवरून संदेश पसरवणे, मनपाच्या सोशल मीडियाद्वारे प्रचार करणे, विविध स्वयंसेवी संघटनांच्या सहकार्याने जनजागृती करणे इ. स्वरूपाची कार्यवाही पुणे मनपातर्फे करण्यात येत आहे. याबाबत अधिक व्यापक प्रसिद्धीसाठी दिनांक ९ नोव्हेंबर २०२१ रोजी महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी सर्व राजकीय पक्षांचे पक्षनेते व पक्षप्रमुख यांची बैठक घेतली. या बैठकीस मा. श्रीमती सुनीता वाडेकर (उप महापौर), मा. श्री. हेमंत रासने (अध्यक्ष, स्थायी समिती), मा. श्री. गणेश बीडकर (सभागृह नेता), मा. श्रीमती दिपाली धुमाळ (विरोधी पक्षनेता), मा. श्री. आबा बागूल (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस), मा. श्री. पृथ्वीराज सुतार (शिवसेना), मा. श्री. साईनाथ बाबर (महाराष्ट्र नवनिर्माण सेना), मा श्रीमती अश्विनी लांडगे (AIMIM), मा. श्री. प्रशांत जगताप (राष्ट्रवादी कॉंग्रेस), मा. श्री. अरविन्द शिंदे (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस), तसेच सर्व क्षेत्रीय आयुक्त उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये उपआयुक्त (निवडणूक) अजित देशमुख यांनी मतदारयादीमधील नाव नोंदणी व दुरुस्तीबाबतच्या अर्जाची माहिती दिली. **नवीन नाव नोंदणीसाठी फॉर्म नं. ६ वापरावा. स्वत:चे नाव वगळण्यासाठी किंवा इतर व्यक्तीचे नाव मृत्यू झाल्याने / स्थलांतरित झाल्याने वगळण्यासाठी फॉर्म नं. ७ वापरावा. मतदार यादीतील तपशिलामध्ये दुरुस्ती करणेसाठी फॉर्म नं. ८ वापरावा. एकाच मतदारसंघामध्ये पत्त्या मध्ये दुरुस्ती करण्यासाठी फॉर्म नं. ८ अ वापरावा. सदर नोंदणी / दुरुस्ती ही www.nvsp.in या संकेतस्थळावर देखील ऑनलाइन पद्धतीने करता येते.** ऑनलाइन प्रक्रिया अधिक सुलभ असून आपल्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती देखील त्यामध्ये बघता येते तसेच ऑनलाइन मतदार कार्ड डाउनलोड करून घेता येते. मतदारांच्या सोयीसाठी व मार्गदर्शनासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामध्ये मतदार नोंदणी कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. या सर्व कार्यवाहीची माहिती सदर बैठकीमध्ये देण्यात आली. यावेळेस मा. पदाधिकारी यांनी उपस्थित केलेल्या विविध शंकांचे निरसन अतिरिक्त आयुक्त श्री. रवींद्र बिनवडे व महापालिका आयुक्त श्री. विक्रम कुमार यांनी केले.

Ajeetdeshmukh

(अजित देखमुख)
**उप आयुक्त (निवडणूक)**
पुणे महानगरपालिका

Scanned with CamScanner